# चारोळ्या – भाग ३२

शब्दात रंगल्या किरणांची ती सांज
मला अजुनी स्मरते
अन् माझ्या स्वप्नांची कविता
माझ्या कानी अजुनी गुंजते.

तू गेल्यावर आठवलं
खूपसं बोलायचं होतं
खूप सारं बोलली तरी
मनातलं सांगायचं राहिलं.

ओठांचा प्याला, अजून
रिकामाच राहिलाय
तुझी वाट, पाहात तो
कधीचा थांबलाय.

चुंबन या शब्दात
किती गोडवा आहे,
तोंडानं उच्चारला तरी
कृतीचा भास आहे.

– पद्माकर चित्रे
(‘मी न माझा’ या चारोळीसंग्रहातून)